# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापनि/२०१३/प्र.क्र.५/का-८
नविन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- ०४/०३/२०१३

## आदेश

**स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक आचार संहितेच्या कालावधीत लोकशाही दिन साजरा करण्याबाबत**

आचार संहिता कालावधीत लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात यावे किंवा कसे याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून वेळोवेळी विचारणा करण्यात येते.

लोकाभिमूख प्रशासनाच्या दृष्टीने घेण्यात येणाऱ्या लोकशाही दिनाच्या कार्यक्रमात स्थानिक प्रशासनाकडून लोकांच्या तक्रारींची दखल घेऊन निरसन केले जाते. त्यामुळे खालील अटींवर अधीन राहून आचार संहितेच्या कालावधीत आयोजित करण्यात येणाऱ्या लोकशाही दिनाच्या आयोजनास परवानगी देण्यात येत आहे.

१) सदर लोकशाही दिनाच्या कार्यक्रमामध्ये लोकांकडून प्रस्ताव स्विकारताना नेमणूका, अनुदान, कर्ज अथवा आर्थिक सहाय मंजूर किंवा अदा करण्यात येऊ नये किंवा संबंधित मतदारांवर प्रभाव पडेल असे कोणतेही निर्णय सदर कार्यक्रमात घेऊ नयेत.

२) ज्या ग्रामपंचायतींच्या सद्या सार्वत्रिक व पोट निवडणुकांबाबत कार्यक्रम सुरू असल्याने संबंधित क्षेत्रात निवडणूक आचार संहिता लागू झाली आहे अशा ग्रामपंचायतींतील स्थानिक रहिवाशांची निवेदने लोकशाही दिनाच्या कार्यक्रमात फक्त स्विकारण्यात यावीत. मात्र त्या अर्जांबाबत कोणताही आदेश किंवा धोरणात्मक निर्णय जाहीर करण्यात येऊ नयेत.

३) तसेच या संदर्भात या आयोगाच्या दिनांक २९/१२/२०११ रोजी निर्गमित केलेल्या आचार संहितेबाबतच्या एकत्रित आदेशांचे व सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या दिनांक २६ सप्टेंबर, २०१२ रोजीच्या लोकशाही दिनासंदर्भातील परिपत्रकातील निर्देशांचे सर्व संबंधितांकडून अनुपालन व्हावे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या निर्देशानुसार.

(आरती सरवदे)
तहसिलदार,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत : जिल्हाधिकारी (सर्व)